अध्यक्ष, वेदांत इन्स्टिटयूट ऑफ ॲकेडमिक एक्सलन्स प्रा.लि., मुंबई संचलित वेदांत इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्सेस, मु.पो. सासवंद, ता. डहाणू, जि. पालघर या वैद्यकीय महाविद्यालयाला सन २०१७-१८ करिता एम.बी.बी.एस. अभ्यासक्रमाची प्रथम बॅच सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
शासन निर्णय क्रमांक एमईडी-२०१५/प्र.क्र.१६/१५/शिक्षण-१,
९वा मजला, गो.ते. रुग्णालय संकुल, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१
दिनांक :- २० जुलै, २०१७

वाचा :-
१) समक्रमांकित दिनांक ०३.०८.२०१६ चे आवश्यकता प्रमाणपत्र
२) भारतीय आयुर्विज्ञान परिषद, नवी दिल्ली यांचे क्र. U १२०१२/७/२०१७-ME १(FTS No ३०९३७४९), दिनांक ३१.०५.२०१७ चे पत्र.
३) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे पत्र क्र. मआविवि/पीबी/युजी/कन्सेंट/मेडिकल/ई २/६०५/२०१६, दिनांक २४.०६.२०१६
४) भारतीय आयुर्विज्ञान परिषदेची अधिसूचना क्र.MCI ३४(४१)/ २००९-Med/ ७६५६५, दिनांक २६.०२.२०१०.
५) भारतीय आयुर्विज्ञान परिषदेची अधिसूचना क्र.MCI ३४(४१)/ २०१६-Med/ १६२९०४, दिनांक १७.०१.२०१७.

**प्रस्तावना:-**

अध्यक्ष, वेदांत इन्स्टिटयूट ऑफ ॲकेडमिक एक्सलन्स प्रा.लि., मुंबई संचलित वेदांत इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्सेस, मु.पो. सासवंद, ता. डहाणू, जि. पालघर या वैद्यकीय महाविद्यालयास दिनांक ०३.०८.२०१५ रोजी आवश्यकता प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आले होते. भारतीय आयुर्विज्ञान परिषद, नवी दिल्ली यांनी दिनांक ३१.०५.२०१७ च्या पत्रान्वये मान्यता प्रदान केली आहे. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी संलग्निकरण दि. २४.०६.२०१६ च्या पत्रान्वये दिलेले आहे. संस्थेने प्रथम वर्षासाठी परवानगी देण्याची विनंती केली आहे. त्यानुसार वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या १५० विद्यार्थी प्रवेश क्षमतेकरिता शैक्षणिक वर्ष सन २०१७-१८ साठी एम.बी.बी.एस. अभ्यासक्रम प्रथम वर्षाकरिता परवानगी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

अध्यक्ष, वेदांत इन्स्टिटयूट ऑफ ॲकेडमिक एक्सलन्स प्रा.लि., मुंबई संचलित वेदांत इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्सेस, मु.पो. सासवंद, ता. डहाणू, जि. पालघर या महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०१७-१८ साठी केंद्र शासनाने संदर्भाधीन पत्र क्रमांक (२) अन्वये १५० विद्यार्थी प्रवेश

क्षमतेसाठी मान्यता दिलेली आहे. त्यानुषंगाने शैक्षणिक वर्ष सन २०१७-१८ साठी एम.बी.बी.एस. अभ्यासक्रम प्रथम वर्षाकरिता सदर वैद्यकीय महाविद्यालयास १५० विद्यार्थी प्रवेशित करण्यासाठी पुढील अटी व शर्थींच्या अधीन राहून परवानगी देण्यात येत आहे.

**<u>अटी व शर्ती:-</u>**

१) अध्यक्ष, वेदांत इन्स्टिटयूट ऑफ ॲकेडमिक एक्सलन्स प्रा.लि., मुंबई संचलित वेदांत इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्सेस,मु.पो. सासवंद, ता. डहाणू, जि. पालघर या वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थी प्रवेश क्षमता केंद्र शासनाने निर्धारित केल्यानुसार १५० एवढी राहील.

२) राज्य शासन/ केंद्र शासन/ मा. सर्वोच्च न्यायालय अथवा मा. उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरीता निश्चित करण्यात आलेली कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी.

३) शासकीय नियम/निर्णय/अधिनियम, मा. सर्वोच्च व मा. उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक शुल्कासाठी जी कार्यपध्दती अनुसरणे वेळोवेळी भाग असेल, त्याप्रमाणे शैक्षणिक शुल्क निश्चित करण्यात यावे.

४) केंद्र शासन, भारतीय आयुर्विज्ञान परिषद, नवी दिल्ली व राज्य शासन यांनी वैद्यकीय अभ्यासक्रमाबाबत वेळोवेळी विहीत केलेल्या नियमांचे व मानकांचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

५) महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिटयुशन्स (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ (महाराष्ट्र ॲक्ट १९९८ चा ६) मधील तरतुदींचे संस्थेने काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

६) सदरहू संस्थेस कायम विना अनुदान तत्वावर मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे संस्था आवर्ती/अनावर्ती स्वरुपाच्या खर्चासाठी अनुदानाची मागणी शासनाकडे करणार नाही.

७) शासकीय वैद्यकीय किंवा तत्सम महाविद्यालयातील कोणत्याही अध्यापकास तो सेवानिवृत्त होईपर्यंत किंवा नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होईपर्यंत संस्थेमध्ये नोकरी देता येणार नाही किंवा त्याच्या सेवा संस्थेस वापरता येणार नाहीत.

८) संस्थेने कोणत्याही परिस्थितीत शासनाने मान्य केलेल्या विद्यार्थी प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी प्रवेशित करु नये.

९) केंद्र शासनाने दिलेली परवानगी ही सन २०१७-१८ वर्षाकरिता प्रवेशित होणारे विद्यार्थी अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षामध्ये दाखल होईपर्यंत असून संस्थेने त्यानुसार पुढील वर्षाचे विद्यार्थी प्रवेश करण्यापूर्वी केंद्र शासनाच्या तसेच त्या आधारे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या परवानगीचे नुतनीकरण करुन घेणे बंधनकारक राहील.

१०) **प्रवेश प्रक्रिया:-** संस्थेतील अभ्यासक्रमाचे प्रवेश हे प्रचलित नियमांनुसार करणे आवश्यक राहील. तसेच संस्थेने गुणवत्तेवर आधारित प्रवेश केलेल्या विद्यार्थ्यांच्या याद्या प्रवेश नियामक प्राधिकरण यांच्याकडून मंजूर करुन घेणेही आवश्यक राहील.

११) **शुल्क संरचना:-** सदर वैद्यकीय महाविद्यालय नफा कमविण्याच्या उद्देशाने स्थापन झालेले असल्याने तेथे प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या सर्व संवर्गातील विद्यार्थी प्रवेशांना अभिमत विद्यापीठासाठी लागू असलेल्या शुल्काच्या अटी लागू राहतील.

२. सदर आदेश केंद्र शासनाने संदर्भीत क्र.(२) अन्वये केंद्र शासनाच्या दिनांक ३१.०५.२०१७ च्या पत्रान्वये दिलेली मान्यता विचारात घेऊन, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ मधील कलम ६४ (५) नुसार शासनास प्रदत्त असलेल्या अधिकाराचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(डॉ. श्री.पुं.कोतवाल)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा. राज्यपाल यांचे सचिव, राज भवन, मलबार हिल, मुंबई
मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. राज्यमंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक.
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक, आयुर्वेद संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अधिष्ठाता/प्राचार्य, वेदांत इन्स्टीट्युट ऑफ ॲकेडमिक एक्सलन्स प्रा.लि., मुंबई संचलित वेदांत इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्सेस,मु.पो. सासवंद, ता. डहाणू, जि. पालघर
ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ, ग्रंथालय, विधानभवन, मुंबई.
अधिष्ठाता, सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालये.
अध्यक्ष, असोसिएशन ऑफ मॅनेजमेंटस ऑफ एन एडेड प्रायव्हेट ॲण्ड डेंटल, कॉलेजेस, महाराष्ट्र, मॅझनिन फ्लोअर, श्री. जी. हाऊस, ७५, मिंटरोड, फोर्ट, मुंबई.

सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण/ शुल्क नियामक प्राधिकरण, २०५, गर्व्हमेंट पॉलीटेक्नीक बिल्डींग, ४९, खेरवाडी, अली यावर जंग मार्ग, बांद्रा (पू) मुंबई-५१.
अवर सचिव (शिक्षण २), वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवडनस्ती (शिक्षण-१)